# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

जा.क्र./पोउआ/वाह/ ७७०९ /२०२४ पुणे दिनांक -२६/१०/२०२४

पुणे शहरातील चतु:श्रृंगी वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, सिंहगड रोड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याचे अनुषंगाने मेट्रोची कामे लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. चतु:श्रृंगी वाहतुक विभागा अंतर्गत टाटा मेट्रो लाईन ३ चे कामाअंतर्गत माऊली पेट्रोल पंप ते महाबळेश्वर चौक येथील पिलर क्र. PMR 16- C to E दरम्यानच्या कामा दरम्यान सुरक्षेच्या उपाय योजना म्हणुन खालील प्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात येत आहे.

**चतु:श्रृंगी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत खालील नमुद मार्गावर दि. २६/१०/२०२४ रोजी १८/०० वा. ते २८/१०/२०२४ रोजी ०६/०० वा दरम्यान खालील प्रमाणे सर्व प्रकारच्या वाहनांना निर्बंध लागु करण्यात येत आहे.**

- पल्लोड फार्म ते विधाते चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर नो एंट्री करण्यात येत आहे.
- ताम्हाणे चौक ते कपिल मल्हार चौक बाणेर रोड पर्यंत नो एंट्री करण्यात येत आहे.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३, पुणे शहर.
३) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

३)पोलीस निरीक्षक, चतु:श्रृंगी वाहतुक विभाग, पुणे शहर